# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // विशेष महासभा बैठकीचे कार्यवृत्त // (ऑनलाईन अपद्वारे)

**सभा क्रं. - २९** **दि.१२/०५/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.१२/०५/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जुलै २०२० अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे) मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ. महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या अर्थसंकल्पीय विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी ऑनलाईन पध्दतीने खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | चौधरी मनोज सुरेश | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | भोईटे लताबाई रणजीत | महाजन सुनिल सुपडु |
| सोनवणे कांचन विकास | पाटील प्रतिभा सुधीर | नाईक प्रशांत सुरेश |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | कापसे मयुर चंद्रकांत | अत्तरदे रजनी प्रकाश |
| बाविस्कर किशोर रमेश | कापसे प्रतिभा चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन |
| कोळी दत्तात्रय देवराम | देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| सपकाळे रंजना भरत | पाटील विजय पुंडलिक | खडके विश्वनाथ सुरेश |
| कोल्हे प्रविण रामदास | सोनवणे सुरेश माणिक | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सनकत चेतन गणेश | भिल पार्वताबाई दामु | देशमुख सुन्नाबी राजु |
| भंगाळे विष्णू रामदास | कोल्हे ललित विजय | पटेल इब्राहिम मुसा |
| तायडे ज्योती शरद | बरडे नितीन मनोहर | सोनवणे निता मंगलसिंग |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे विक्रम किसन |
| काळे अमित पांडुरंग | राणे गायत्री इंद्रजित | **स्विकृत सदस्य** |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे कैलास नारायण |
| काळे दिपमाला मनोज | चव्हाण ज्योती बाळासाहेब | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| सोनवणे अश्विन शांताराम | मराठे जितेंद्र भगवान | मराठे राजेंद्र नारायण |
| पाटील सचिन भिमराव | ढेकळे सदाशिव गणपत | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मा.अतिरिक्त आयुक्त, डॉ.सौ.विद्या गायकवाड, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त श्री.शाम गोसावी, उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी श्री.कपील पवार, सहा.आयुक्त श्री.आकाश डोईफोडे, व सहा.आयुक्त श्री.पवन पाटील तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.

**नगरसचिव :-** सन्मा सभागृहाचं आजच्या विशेष महासभेत स्वागत आहे. सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करण्यात येते की सर्वांनी वंदे मातरम्‌साठी उभे राहायचे आहे.

**वंदे मातरम्‌ने सभेस सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा .सदस्या सौ.मिना धुडकु सपकाळे,शेख सईदा युसुफ, सौ.चौधरी मंगला संजय, सौ.तायडे सुरेखा नितीन तसेच सन्मा.सदस्य श्री.सुनिल वामनराव खडके यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत. सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत आहे. विषय पत्रिकेवरील विषयांना सुरूवात करण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** आजच्या दि.१२/०५/२०२१ रोजीच्या महासभेला सुरुवात करण्यापुर्वी कोविड-१९ च्या महामारीमुळे जळगांवातील ज्या व्यक्ती दगावाल्यात त्यांच्याप्रती संवेदना व्यक्त करण्यासाठी आपण सर्वांनी दोन मिनीटे स्तब्द उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करु या.

**नगरसचिव :-** यानंतर मा.महापौर महोदया या सर्व सभागृहाला व सर्व ऑनलाईन उपस्थित सन्मा.सदस्यांना एक नम्रपणे निवेदन देऊ ईच्छितात.

**मा.महापौर :-** भारतातील लोकशाही ही संपुर्ण जगाला आदर्शवद वाटते. कारण याठिकाणी या जन्मभुमीवर महात्मा ज्योतीबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, श्री.छत्रपती शिवाजी महाराज व राजेश्री शाहुमहाराज यासह अनेक विभुदींच्या लोकार्याचा ठसा आपल्या सर्वांच्या मनावर पिढयानी पिढा उमटलेला आहे. सत्तेत स्वत: न राहता,समाजाची रचना, अडीअडचणी, जडनघडन,समस्या, जागर यांचा परिपुर्ण अभ्यास असलेले पुजणिय शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना मी वंदन करते, आदरणीय श्री.उध्दव ठाकरे साहेब, आदरणीय श्री. आदित्य ठाकरे साहेब, पित्रतुल्य आदरणीय श्री.सुरेशदादा जैन, महाराष्ट्रातील माझ्या सारखी सामान्य महिलेला महापौर पदापर्यंत विराजमान करणारे आमचे मार्गदर्शक आदरणीय एकनाथजी शिंदे साहेब, विनायकजी राऊत साहेब, जळगांव जिल्ह्याचे लाडके पालकमंत्री, श्री.गुलाबरावजी पाटील, जिल्हा संपर्कप्रमुख श्री.संजयजी सावंत साहेब, रावेर तालुका संपर्कप्रमुख श्री.विलासजी पारकर साहेब, आमचे नेते श्री.नितीनभाऊ लढ्ढा, शिवसेनेचे कट्टर कार्यकर्ते श्री.गजाननजी मालपुरे, शिवसेना महानगरप्रमुख, श्री.शरदजी तायडे व हजारो कार्यकर्त्यांनी मला या पदावर बसविले आणि जनसेवेची संधी दिली. त्याबद्दल मी सर्वांची ऋणी आहे. आज या सभागृहात महापौर या नात्याने प्रथमच आपल्याशी संवाद साधतांना मला आठवण होत आहे श्रीमती आशाताई कोल्हे यांची, तनुजाताई तडवी, सौ. राखीताई सोनवणे, सौ.जयश्रीताई धांडे, सौ.सिमाताई भोळे, सौ.भारतीताई सोनवणे या सर्व माजी महापौरांचे तसेच स्थायी समितीचे माजी सभापती ॲड.सौ.शुचिताताई हाडा या सर्व बघिणींनी जळगांव शहराला आपले कुटुंब माणुन आपआपल्यापरीने उत्तमरित्या जबाबदारी पेलनेचे महत्वपुर्ण काम केले. भलेही आम्ही सर्व विभागामध्ये परिपुर्ण काम करु शकलो नाही. परंतु प्रांजलपणे प्रयत्नांची पराकष्टा नक्कीच केली. माझ्या अडीच वर्षाच्या या कार्यकाळात आपल्या सर्वांच्या सहकार्याने, माझे सहकारी श्री.कुलभुषण पाटील व सर्व सदस्यांच्या सहकार्याने जळगांव शहर महापालिका, सर्वातोपरी लोकभुमी करण्याचा आम्हा सर्वाचा प्रयत्न आहे व तो राहील. मग तो शिक्षण, आरोग्य, नियमीत स्वच्छ पाणी पुरवठा,दिवाबत्ती आदी विषयापासुन तर जळगांवच्या सर्वांगीण विकासापर्यंत राहील. जळगांव महापालिकेच्या व्यापार संकुलातील गाळे धारक अथवा फेरीवाल्यांचा प्रश्न असो, यामध्ये कोणतेही राजकारण आड न येता, शांततेत, सुसुत्रताबध्द कायद्याच्या चौकटीत राहुन जळगांव शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचा माझा प्रयत्न राहील. त्याचाच एक भाग म्हणजे सर्व प्रभागातील लहान मोठी कामे मार्गी लावण्यासाठी आपण सुरु केलेला महापौर सेवा कक्ष, माझ्या सभागृहातील सर्व सदस्यांना ही नम्र विनंती आहे की, हे सभागृह या पुढील काळात आरोप प्रत्यारोप, हेवे दावे,सर्व बाजुला ठेवुन आपण सर्व जण मिळुन जळगांव शहराचे पुनश्च नाव लौकीक करुन देण्यासाठी प्रत्येक जण प्रांजलपणे प्रयत्न करु या. निवडणुका आल्यावर आपण राजकारण करु च पण त्याहीपेक्षा मला राजकारण नको, मला समाजकारण अधिक महत्वाचे वाटते, सभागृहात प्रशासन, सर्व नगरसेवक बंधुबघिणी अनुभव व प्रतिमेचे सक्षमच आहे. पत्रकार, छायाचित्रकार बंधुही येथे आहेत, आपले सर्वांचे प्रत्येक विचार यापुढे विकासासाठी सदैव माझ्यासोबत असु द्यावेत ही नम्र विनंती. मा.आयुक्त, सर्व उपायुक्त, तसेच अधिकारी, कर्मचाऱ्यांचे सहकार्य, कायमच माझ्यासोबत राहतील आणि आहेत. मात्र माझ्या नम्रतेला गृहीत धरुन कामचुकार अधिकारी कर्मचारी यांना मी विनम्रपणे सांगु ईच्छिते की, मला कठोर निर्णय घ्यायला भाग पाडु नका, कारण एक दोन टक्के अश्या लोकांमुळे संपुर्ण प्रशासनाला दोष दिला जातो. वास्तविक अनेकांनी चांगले काम करायचे आहे. मात्र अनावश्यक बाबींमुळे त्यांचा वेळ आणि श्रम हे वाया जातात. आपल्याकडे मी सर्व विकासाभुमिक कल्पनांचे स्वागत करते व माझ्या या दोन शब्दांना विराम देते. धन्यवाद जयहिंद जयमहाराष्ट्र.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ३२५ दिनांक ३१/०३/२०२१ अन्वये मान्यता प्रदान केलेली असुन महासभेच्या मान्यतेसाठी आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दि.३१/०३/२०२१ प्रमाणे स्थायी समितीने मान्य केलेल्या अर्थसंकल्पाला मान्यता देण्यात यावी.
**मा.उपमहापौर, श्री.कुलभुषण पाटील :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.सुरेश सोनवणे :-** हॅलो, महापौरताई मला बोलायचे आहे या विषयावर. हॅलो, महापौरताई मला बोलायचे आहे.
**श्री.राजेंद्र पाटील :-** मा.महापौर महोदया, सन्मा.उपमहापौर आणि सन्मा.सदस्य सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाजपत्रक आणि सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक आज सन्मा.सभागृहापुढे सादर करीत आहे. महोदया मुलभुत आवश्यकताओं की पुर्ती आवश्यक है. पर आवश्यकताओं की सुजनकर अपनी पुर्ती हेतु कुछ भी करना अनावश्यक है. मांग और पुर्तीका सिध्दांत बाजारसे पुर्व जिवनपर लागु होता है. तो चलिए अर्थशास्त्रसे समनजस बनाए. या उक्तीप्रमाणे या आवश्यकतेप्रमाणे जळगांव शहराची पुर्ती करणारा अर्थसंकल्प सन २०२१-२२ आपणासमोर मांडत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीस अनुसरुन प्रशासनाने दि.२५/०२/२०२१ रोजी अंदाजपत्रक स्थायी समिती समोर सादर केलेले आहे. प्रशासनाने सादर केलेल्या अंदाजपत्रकावर विचार करुन निर्णय घेण्यासाठी सभा तहकुब करण्यात आली होती. सदरची तहकुब झालेली सभा दि.३१/०३/२०२१ रोजी घेण्यात आली. मी या महासभेत जळगांव शहर महानगरपालिकेचा सन २०२०-२१ चा सुधारीत आणि सन २०२१-२२ चा मुळ प्रस्तावीत अर्थ संकल्प आपणासमोर सादर करीत आहे. दि.३१/०३/२०२१ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत या प्रस्तावीत अर्थसंकल्पाला मान्यता देण्यात आलेली आहे. कोरोनाच्या दुसऱ्या लाटीचा आज अवघा देश सामना करीत आहे. अश्या काळात हा अर्थ संकल्प तयार करावा लागलेला असुन सद्यास्थितीचे भान राखावे लागले आहे. कोरोनामुळे एकुणच अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम, सामान्य जनतेचे बिगडलेले आर्थिक गणित, या सर्व बाबी अर्थ संकल्प तयार करतांना डोळयासमोर ठेवावे लागले आहे. त्यामुळेच महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आणि इतर महत्वाच्या करामध्ये कोणतीही वाढ यात दर्शविलेली नाही. काही दाखले सेवा शुल्क, या मध्ये प्रशासनाने वाढ दर्शविलेली होती. मात्र स्थायी समितीने ही सुचविलेली वाढ जशीच्या तशी न स्विकारता, ती वाढ कमीतकमी करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. कर आणि दरात वाढ केलेली नसली, तरी वसुली वाढीवर आमचा भर राहणार आहे. दुसऱ्या बाजुला कर्मचारी यांचे पगार, महानगरपालिकेचे दैनंदिन सेवा जसे साफसफाई, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, वैद्यकीय सुविधा, रस्ते दुरुस्ती आदीसाठीचा खर्च वाढ होणे सहाजीकच असुन ही वाढ या निमित्ताने डोळयासमोर ठेवण्यात आलेली आहे. वाढणारा हा खर्च भरुन काढण्यासाठी आपणाला त्या कराचा परिणामकारक वसुलीवर अधिक भर द्यावा लागणार आहे. प्रस्तावीत अर्थ संकल्पात सुचित केलेल्या ठळक बाबी पुढील प्रमाणे देत आहे. या अर्थ संकल्पाला आपण जशीच्या तशी किंवा आवश्यक वाटल्यास उचित फेरबदलासह मान्यता द्यावी अशी विनंती मी स्थायी समितीच्या वतीने सादर करीत आहे. अर्थसंकल्पात खालील प्रमाणे बाबी दिलेल्या आहेत. प्रशासनाने वारसहक्काने मिळकत हस्तांतरीत करणेबाबतची सेवाशुल्क फी रु.५००/- सुचवली होती. ती स्थायी समितीने रु.३००/- केलेली आहे. वारस हक्का व्यतिरीक्त मिळकती हस्तांतरण करणेसाठी रु.५००/- सुचविलेले होते. ते स्थायी समितीने रु.३००/- केलेले आहे. मिळकत कराचे डुबलीकेट बिलसाठी रु.१००/- सुचवली होती. ती फी आपण रु.२०/- केलेली आहे. नविन नळ संयोजन फॉर्म फी रु.५०/- ऐवजी आपण रु.२०/- केलेली आहे. असे सेवा शुल्कात बदल करण्यात आलेले आहे. तसेच महसुली जमा प्रशासनाने ९,४६,२८,०००/- अपेक्षित दाखविलेली होती, स्थायी समितीने त्याच्यावर १५ कोटीची तरतुद केलेली आहे. म्हणजेच ५,५३,७२,०००/- ची वाढ सुचवलेली आहे. तसेच मालमत्ता कर, प्रशासनाने ७५.३० कोटी अपेक्षित रक्कम सुचवलेली होती. ती स्थायी समितीने त्यांच्या वसुलीवर भर देण्याचे अधिकाऱ्यांना सुचविलेले आहे, प्रशासनाने गाळे भाडेसाठी १६० कोटीची तरतुद केलेली होती. त्याच्यावर जास्तीत जास्त वसुली कशी होईल. यासाठी प्रशासनाने प्रयत्न करावे. ते जवळ जवळ १९५ कोटीची तरतुद त्यामध्ये सुचवलेली आहे. खुला भुखंड कर यामध्ये प्रशासनाने ८ कोटीची तरतुद केलेली होती. खुला भुखंड कर हा जास्तीत जास्त वसुल झाला पाहिजे. म्हणुन आपण तो स्वतंत्र न ठेवता, प्रत्येक प्रभाग समितीमध्ये खुलाभुखंड हा वर्ग करण्यात आलेला आहे. आणि चारही प्रभाग समित्यांच्या माध्यमातुन जास्तीत जास्त

खुल्याभुखंड कराची वसुली झाली पाहिजे. साधारणता ती १६ कोटीच्या जवळपास झाली पाहिजे अशी आपण तरतुद केलेली आहे. त्यानंतर खर्च महसुली खर्च, त्यामध्ये विद्युत व्यवस्था यामध्ये आयुक्तांनी म्हणजेच प्रशासनाने ६० लाखाची तरतुद केलेली होती. आम्ही ती जशीची तशी ठेवली, आणि त्यात प्रभाग समित्या सक्षम व्हाव्या,या उद्देशाने आपण चारही प्रभागांसाठी वेगळी तरतुद केलेली आहे. प्रभाग समिती क्र.०१ साठी २० लक्ष, प्रभाग समिती क्र.२,३ आणि ४ साठी प्रत्येकी १२ लक्ष, अशी ५६ लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच लाईट व्यवस्था व दुरुस्ती, प्रशासनाने २५ लाखाची या हेड खाली तरतुद केलेली आहे. आम्ही प्रभाग समिती क्र.०१ साठी ३५ लक्ष, प्रभाग समिती क्र.२,३ आणि ४ साठी प्रत्येकी १३ लक्ष अशी तरतुद केलेली आहे. लाईट दुरुस्तीसाठी जवळ जवळ ७४ लक्षची वाढ केलेली आहे. सिग्नल व्यवस्था शहरातील सिगंल हे जुन्या पध्दतीची झालेली आहे. ॲडव्हान्स पध्दतीचे सिग्नल जळगांव शहरात लावण्यात यावे.यासाठी आपण प्रशासनाने १० लाखाची तरतुद केलेली होती. ती आपण ५० लक्षाची तरतुद केलेली आहे. सोलर पावरसाठी प्रशासनाने २० लाखाची तरतुद केलेली होती.ती आपण २ कोटींची केलेली आहे. साधारण त्याच्यामध्ये १ कोटी ८० लक्षची वाढ सुचवलेली आहे. नालेस्वच्छता प्रशासनाने २५ लाखाची तरतुद सुचवलेली आहे. ती जशीच्या तशी ठेवुन आम्ही प्रभाग समिती क्र.०१ साठी ३ लक्ष, प्रभाग समिती क्र.२ साठी ५ लक्ष, प्रभाग समिती क्र. ३ साठी १० लक्ष, प्रभाग समिती क्र.४ साठी ५ लक्ष मात्रची तरतुद करण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सभापती महोदय, आपण याची सुधारीत कॉपी सर्व सदस्यांना देणार आहोत.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मा.महापौर महोदया, आपल्याला,

**श्री.ईब्राहिम पटेल** :- मा.महापौर महोदया, मला बोलायचे आहे. राजु भाऊ आपण प्रभाग समिती करीता प्रत्येकाला २० लाख दिलेले आहे. परंतु अडीच वर्षात काही तरी खर्च केलेले आहे का ?

**मा.उपमहापौर :-** सभापती महोदय, जसे महापौरांनी सांगितले की, आपण याची कॉपी सर्व सदस्यांना देणारच आहे. स्थायीच्या मिटींगमध्ये चर्चा झालेलीच आहे. प्रशासनाने त्यांच बजेट सादर केल्यानंतर तुमची प्रतिक्रिया त्याच्यावर झालेलीच आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** मला माझे मनोगत व्यक्त करु द्या. अर्थसंकल्प तर सादर झालेलाच आहे. मनोगत व्यक्त करण्याची परवानगीच देऊ नका असे असेल तर. अर्थ संकल्पाची कॉपी प्रत्येकाला मिळणार आहे. मला माझे मनोगत व्यक्त करु द्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करा राजु भाऊ. करा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्यानंतर साथीचे रोग, आज कोविडचा संसर्ग पुर्ण जगभर पसरलेला आहे. आपल्या जळगांव शहरात ही मोठया प्रमाणात कोविडचे रुग्ण आढळत आहे. त्यासाठी प्रशासनाने १० लाखाची तरतुद केलेली होती ती आपण ३ कोटीची तरतुद केलेली आहे. पुर्ण स्थायीची मंजुरी घेऊन.सर्व पक्षीय सदस्यांनी त्याला मंजुरी दिलेली आहे. तसेच स्मशानभुमी, मोफत दफन, आणि लाकडे याच्यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. बालगंधर्व खुले नाटयगृहासाठी २५ लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच सार्वजनिक उद्यानांसाठी आपण प्रत्येक समितीसाठी २ लक्ष प्रत्येकी प्रमाणे ८ लक्षची तरतुद केलेली आहे. सार्वजनकि बांधकाम इमारत व्यवस्था व दुरुस्तीसाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच प्रत्येक प्रभाग समितीसाठी २५ लक्षची तरतुद केलेली आहे. चारही समित्या मिळुन १ कोटीची तरतुद केलेली आहे. रस्ते व्यवस्था व दुरुस्तीसाठी आपण प्रभागनिहाय प्रत्येकी समितीसाठी २५ लक्षची तरतुद केलेली आहे. अशी आपण चारही मिळुन एक कोटीची तरतुद केलेली आहे. गटार व्यवस्था व दुरुस्तीसाठी आपण ३ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच व्यापारी संकुल व इमारती व्यवस्था व दुरुस्ती आपण ५ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच प्रत्येक प्रभागासाठी १० लक्षची तरतुद केलेली आहे प्रभाग समित्यांसाठी. पुतळे व्यवस्था व दुरुस्तीसाठी १० लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच प्रत्येक प्रभाग समितीसाठी १ लक्षची तरतुद केलेली आहे. दिशादर्शक व रस्ते मार्गदर्शक यासाठी ५० लक्षची तरतुद केलेली आहे. क्रिडा स्पर्धा व महापौर चषक साठी आपण १० लक्षची तरतुद केलेली आहे. राष्ट्रीय विजेता योजना १५ लक्षची तरतुद केलेली आहे. आर्थिक मदतीसाठी आपण ५० लक्षची तरतुद केलेली आहे.तसेच प्रभाग समिती नामनिर्देशित सदस्य मानधन यासाठी आपण १ लक्षची तरतुद केलेली आहे. प्राथमिक शिक्षण या हेड खाली क्रिडा स्पर्धा व योग प्रशिक्षण वर्ग यासाठी ५ लक्षची तरतुद केलेली आहे. तसेच आर्किटेक्ट फीसाठी आपण १० लक्षची तरतुद केलेली आहे. त्याचप्रमाणे नविन गटारीसाठी आपण ४ कोटीची तरतुद केलेली आहे. प्रभाग समिती निहाय आपण चारही समित्यांसाठी एकुण १ कोटीची तरतुद केलेली आहे. नविन संडास मुतारीसाठी प्रत्येकी

२० लक्ष प्रभाग समितीसाठी दिलेले आहे. असे एकुण ८० लक्ष चारही प्रभागांसाठी दिलेले आहे. नविन बगिचे उद्याने यासाठी २ कोटीची तरतुद केलेली आहे. नविन इमारती व फायरस्टेशन बांधणे व वार्ड ऑफिस बांधणे यासाठी २ कोटीची तरतुद केलेली आहे आणि सर्वात महत्वाची गोष्ट आज आपली महापालिका कर्जमुक्त झालेली आहे. त्यामुळे आपण नविन रस्त्यांसाठी १२५ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच नविन वाहने यांच्यासाठी आपण २ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच नविन स्मशानभुमीसाठी आपण १ कोटीची तरतुद केलेली आहे. नविन पादचारी रेल्वे उड्डाणपुल यासाठी १० कोटीची तरतुद केलेली आहे. दिक्षाभुमी बांधणे यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. नविन पुतळे यासाठी ५० लक्षाची तरतुद केलेली आहे. रेडक्रॉस मागील जागा विकसीत करण्यासाठी आपण २ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच समांतर रस्त्यावर लाईट खांब उभे करण्यासाठी २ कोटीची तरतुद केलेली आहे. विद्युतवाहन दाहीणी बसविणे यासाठी ५० लक्षाची तरतुद केलेली आहे. तसेच भांडवली खर्च शासकीय योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत रस्ते विकास प्रकल्प मा.आयुक्त साहेब यांनी ४२ कोटी १० लक्षाची तरतुद केलेली होती. ती आपण १०० कोटीची केलेली आहे. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी अकृषक सारा म्हणुन ३ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच जनता अपघात विमा यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** राजु भाऊ ही स्थायी समिती नाही, ही महासभा आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ आटोपले, शेवटचे आहे. आपण वेळ घ्याल तर त्यात जास्त वेळ जाईन. जनता अपघात विमा यासाठी १ कोटीची तरतुद केलेली आहे. तसेच आपण परिशिष्ट अ मध्ये नमुद केले प्रमाणे, जमा बाजुस नगररचना ५,५३,७२,०००/- घरपट्टी मध्ये २२ कोटी ४९ लाख मार्केट वसुली मध्ये ३५ कोटी, खुला भुखंड मध्ये ८ कोटी, सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मध्ये ५८ कोटी मात्रची वाढ सुचविलेली आहे. खर्च बाजुला विविध कामांसाठी महसुली खर्चात एकुण रु.२० कोटी ९९ लाख, भांडवली खर्च ४४ कोटी ७० लाख व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान ५७ कोटी ९० लाख वाढ सुचविलेली आहे. मुख्यता सोलर पॅनल बसविणे, संसर्ग जन्य रोग प्रतिबंधक उपाय योजना, मोफत दहन दफन, बगीचे सुशोभिकरण, इमारत दुरूस्ती, रस्ते व्यवस्था व दुरूस्ती, व्यापारी संकुल व्यवस्था व दुरूस्ती, जनता अपघात विमा, नविन गटारी, नविन बगिचे,नविन रस्ते, उड्डाणपुल, समांतर रस्ते, नविन लाईट, विद्युत दाहिणी बसविणे, इत्यादी लोक अभिमुख कामांसाठी भरगोस वाढ केलेली आहे. रस्त्यांची अवस्था फारच बिकट झालेली आहे. प्रशासनाने वसुलीवर जास्तीत जास्त भर देऊन नागरीकांना मुलभुत सोईसुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. महानगरपालिकेचा अर्थ संकल्प करीतांना अहोरात्र परिश्रम घेऊन तयार केल्याबद्दल मा.स्थायी समितीचे सर्व सन्मा.सदस्य, मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त साहेब, मा.मुख्य लेखाधिकारी, मा.मुख्य प्रमुखलेखापाल, सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार, तसेच प्रशासनाने सादर केलेला अर्थ संकल्पात सुधारणा करण्यासाठी, शिफारशी व मार्गदर्शन केल्या बद्दल सर्व स्थायी समिती सदस्यांचे ज्ञात अज्ञात असे सर्वांचेच मनपुर्वक आभार व्यक्त करतो. अंदाजपत्रक तयार करतांना सर्व काही विचार करून वाढीव तरतुद तयार करण्यात आलेल्या असुन महासभेने अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करावी ही अपेक्षा धन्यवाद.

**श्री.नितीन लढढा :-** मा.महापौरताई अर्थसंकल्पास मान्यता देण्यात यावी.

**मा.महापौर :-** मान्य आहे. विषयपत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.४५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ३२५ दिनांक ३१/०३/२०२१ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ३२५ दिनांक ३१/०३/२०२१ मध्ये नमूद केलेल्या बाबी व स्थायी समितीने मंजुर केलेल्या अंदाजपत्रकास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीच्या अनुषंगाने मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने जळगांव शहर महानगरपालिकेचे सन २०२०-२१ चे सुधारीत अंदाज पत्रकासह सन २०२१-२२ चे मुळ अंदाजपत्रक अपेक्षित योग्य त्या दुरुस्त्यांसह परिपुर्ण अर्थसंकल्पाची प्रत सर्व सन्मा.सदस्यांना वितरीत करण्याची दक्षता घ्यावी. तसेच सदर अंदाजपत्रकाच्या छपाईसाठी येणाऱ्या खर्चासही याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ४७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**